पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १२/१०/२०२०

## पोलीस भरतीच्या सरावासाठी ईच्छुक उमेदवारांना मोफत साहीत्याचे वाटप

❖ गडचिरोली पोलीस दल व जन संघर्ष समिती नागपुर यांचा स्तुत्य उपक्रम

गडचिरोली जिल्हयातील शहरी भागातील सुशिक्षीत बेरोजगार युवक-युवती आगामी काळात होणाऱ्या पोलीस भरतीकरीता मोठया प्रमाणात सराव करतांना दिसुन येत आहेत. परंतु दुर्गम व अतिदुर्गम भागातील सुशिक्षीत बेरोजगारांना योग्य मार्गदर्शन व साहित्याचा अभाव असल्यामुळे तसेच पोलीस भरतीला नक्षलवाद्यांचा विरोध असल्यामुळे या तरुण-तरुणामध्ये आत्मविश्वासाचा अभाव जाणवतो. अशा उमेदवारांसाठी गडचिरोली पोलीस दल दरवर्षी पोलीस भरतीपुर्व प्रशिक्षण राबवुन त्यांना स्वत:च्या पायावर उभे करुन त्यांचे उज्वल भवितव्य घडविण्यासाठी प्रयत्न करीत असते.

परंतु चालु वर्षात कोविड-१९ या साथ रोगाच्या पार्श्वभुमीवर असे उपक्रम राबविणे जिकीरीचे असल्यामुळे, दुर्गम व अतिदुर्गम भागातील अनेक गरीब बेरोजगार युवक-युवती अनवाणी पायाने सराव करत असुन तसेच त्यांच्याकडे शुज, टी-शर्ट, लोअर, गोळा उपलब्ध नसल्याचे लक्षात आल्याने मा. पोलीस अधीक्षक श्री अंकित गोयल सा़े. यांचे मार्गदर्शनाखाली गडचिरोली पोलीस दल व जनसंघर्ष समिती नागपुर यांचे संयुक्त विद्यमातुन उपविभाग अहेरी अंतर्गत उप पोलीस स्टेशन राजाराम (खां) येथे एकुण ६५ युवक-युवतींना भरतीपुर्व प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या शुज, टी-शर्ट, लोअर, गोळा साहीत्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी श्री बजरंग देसाई, उपविभागीय पोलीस अधिकारी अहेरी, सपोनि- रविंद्र भोरे, प्रभारी अधिकारी उपपोस्टे राजाराम (खां.) तसेच जनसंघर्ष समिती नागपुरचे दत्ता शिर्के, उपाध्यक्ष रितेश बळवाही, डॉ श्रृती आष्टनकर, जनसंघर्ष समितीचे सदस्य तसेच पोउपनि अमोल खटावकर, पोउपनि विजय कोल्हे, पोउपनि गणेश कड, एसआरपीएफचे अधिकारी/कर्मचारी तसेच जिल्हा पोलीस दलाचे कर्मचारी उपस्थित होते.

ईच्छुक उमेदवारांनी नवचैतन्याचे या स्तुत्य उपक्रमाबाबत गडचिरोली पोलीस दलाचे आभार मानले असुन मा. पोलीस अधीक्षक श्री अंकित गोयल सा़े. यांनी पोलीस भरतीकरीता सराव करणाऱ्या या उमेदवारांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.


स्टेशन राजाराम
KIZASHI
REDMI NOTE 8 PRO
AI QUAD CAMERA


REDMI NOTE 8 PRO
AI QUAD CAMERA